वाचाः- १. शासन परिपत्रक क्र एसआरसी/१०८५/१०२९/४३/१५ दि-१२/०५/१९८६
२. सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र विपुस/१०९८/६९५/प्रक्र ६८/९८/१५ दि-१४ डिसेंबर १९९९
३.शासन निर्णय क्र.एलपीएल-२०१७प्रक.क्र.२१/का.पंधरा दिनांक १० जुन २०१९
४.मा.मु.का.अ.जि.प.जळगांव या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :- ०१/१२/२०२१

---

**आदेश**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.बांध/आस्था-७/आरआर/३६६/२०२१
बांधकाम विभाग,जिल्हा परिषद,जळगांव
दिनांकः-२९/१२/२०२१

संदर्भिय आदेश क्र १ ते ३ अन्वये वय ५० ते ५५ वयोगटातील तसेच ३० वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी यांची सेवा पुर्नविलोकन करण्याबाबत एकत्रित कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.त्यानुसार बांधकाम विभागाकडील गट क व गट ड कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संवर्गाचे ५०, ५५ वर्षे झालेल्या व सेवेची ३० वर्षे अर्हताकारी सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांचे पुर्नविलोकन करण्याकरिता ज्यांच्या वयाची ५० वर्ष अर्हकारी सेवेची ३० वर्ष पुर्ण होते वेळी या पैकी जे अगोदर घडेल तेव्हा पुर्नविलोकन करण्यासाठी शासन निर्णय क्र ३ अन्वये खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

१) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि प जळगांव - समिती अध्यक्ष
२) मा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) जि प जळगांव - सदस्य
३) मा जिल्हा आरोग्य अधिकारी जि प जळगांव - सदस्य
४) मा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जि प जळगांव - सदस्य सचिव

वरील समितीने बांधकाम विभागाअंतर्गत येणारे संवर्ग शाखा अभियंता / कनिष्ट अभियंता, स्थापत्त्य अभियांत्रिकी सहाय्यक, आरेखक, यांत्रिकी व मैल कामगार यां संवर्गाअंतर्गत कार्यरत असलेले वय ५० ते ५५ वयोगटातील तसेच ३० वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचारी यांची सेवा पुर्नविलोकन करुन ते पुढील सेवेस पात्र आहेत किंवा नाही याबाबतचे आदेश काढण्यात यावे.

**(डॉ. पंकज आशिया, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) जि जळगांव
प्रत :- उप अभियंता बांधकाम उपविभाग (सर्व) जि जळगांव

२/- बांधकाम विभागाअंतर्गत कार्यरत शाखा अभियंता / कनिष्ट अभियंता, स्थापत्त्य अभियांत्रिकी सहाय्यक, आरेखक, यांत्रिकी व मैल कामगार या संवर्गात वयाची ५५ व्या वर्षी तसेच ३० वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव समिती समोर पाठविण्यात यावेत.

प्रत :- बांधकाम आस्था १,२,३,४ यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव

आस्था-२

**(डॉ. पंकज आशिया, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

RR/364/2021
23/12/2021